# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ

माहितीचा अधिकार

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्र. MHSICMU/२०२४/M/००१०७१**

**अपिलार्थी श्री. विजय सांगा शियाळ**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा अव्वल कारकून सक्षम प्राधिकारी-२, (टे-४)**
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, मुंबई.
३ रा मजला, ए-विंग, प्रशासकीय इमारत,
प्रो. अनंत काणेकर मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१.

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा नायब तहसिलदार सक्षम प्राधिकारी-२ (टे-४)**
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, मुंबई.
रूम क्र..३०२, ३ रा मजला, ए-विंग, प्रशासकीय इमारत,
प्रो. अनंत काणेकर मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१.

**<u>व्दितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : ११.०८.२०२५</u>**

अपीलकर्ता : उपस्थित
विद्यमान जन माहिती अधिकारी : अनुपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : उपस्थित

| मूळ अर्ज दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याचा उत्तराचा दिनांक | प्रथम अपील दिनांक | प्रथम अपील आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| २०.१०.२०२३ | १७.११.२०२३, १४.०३.२०२४ | २६.१२.२०२३ | ०२.०२.२०२४ |

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि. १८.०४.२०२४ रोजीच्या अर्जांन्वये माहिती देण्यात आलेली नाही असे कारण नमूद करुन द्वितीय अपील दाखल केले आहे.

द्वितीय अपील अर्जासोबत अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचे पत्र दि. १७.११.२०२३, १४.०३.२०२४ व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेश दि. ०२.०२.२०२४ संलग्न केले आहेत.

अपिलार्थी यांनी दि. २०.१०.२०२३ रोजीच्या माहिती अर्जानुसार मौजे जुहू, ता. अंधेरी, जि. मुंबई उपनगर, के/ पश्चिम, जुहू रोड, सर्वे क्र. ७१, न.भू.क्र. १०४९ (१०४९-अ) येथील झोपडी गणना मोहिम-२००० अंतर्गत भरलेल्या गणना पत्रक अर्जाचा अनुक्रमांक (गणना पावती क्रमांक) ०२८०००५ संबंधीत ५ मुद्यांची मागणी केली होती. जन माहिती अधिकारी यांनी दि. १७.११.२०२३ रोजी अपिलार्थींना कळविले की, माहिती अर्जातील माहिती या कार्यालयाच्या अभिलेखात उपलब्ध नसल्याने पुरविता येत नाही. अपिलार्थींचे समाधान न झाल्याने त्यांनी दि. २६.१२.२०२३ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि. ०२.०२.२०२४ रोजी अर्जदार यांचे अपील अर्जानुसार मागणी केलेल्या माहितीचा पुन्हा शोध घेऊन माहिती उपलब्ध झाल्यास अपिलार्थीस पुरविण्यात यावी असे आदेशित केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेशानंतर जन माहिती अधिकारी यांनी दि. १४.०३.२०२४ रोजी अपिलार्थींना कळविले की, या कार्यालयाचे उपलब्ध अभिलेखामध्ये आपण मागणी केलेल्या माहितीचा पुन्हा शोध घेतला असता मागणी केलेली माहिती आढळून येत नाही. त्यामुळे मागणी केलेली माहिती पुरविता येत नाही.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित असून अपिलार्थी यांनी आयोगास सादर केले की, त्यांनी सन- २०१२ मध्ये तहसिलदार (अति/निष्का) बांद्रा यांच्याकडे माहिती अर्ज सादर करुन संबंधीत तहसिलदार कार्यालयाकडे माहिती अर्जात नमुद केलेली माहिती प्राप्त केली होती व सदर माहिती त्यांनी व्दितीय अपील अर्जासह संलग्न केलेली आहे. अपिलार्थी यांनी आयोगास सादर केले की, जेव्हा तहसिलदार/उपजिल्हाधिकारी (अति/निष्का) बांद्रा कार्यालयाकडून झोपडीधारकांचे सर्व्हेक्षण विषयी सर्व अभिलेख सक्षम प्राधिकारी-२, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, बांद्रा कार्यालयाकडे हस्तांतरीत केले आहे. तेव्हा समक्ष प्राधिकारी-२, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, बांद्रा यांच्या कार्यालयात सर्व अभिलेख उपलब्ध असणे आवश्यक आहे. तरी जन माहिती अधिकारी, सक्षम प्राधिकारी-२, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, बांद्रा यांनी कळविले की, अभिलेखात शोध घेतला असता मागणी केलेली माहिती आढळून येत नाही.

अपिलार्थींना अपेक्षित असलेली माहिती सन- २०१२ मध्ये तहसिलदार (अति/निष्का) बांद्रा यांच्याकडून प्राप्त झालेली आहे आता तीच माहिती जन माहिती अधिकारी, सक्षम प्राधिकारी-२, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, बांद्रा कार्यालयाकडून अपेक्षित आहे. अपिलार्थी आयोगास कोणताही पुरावा सादर करु शकले नाही की, सदर अभिलेख सक्षम प्राधिकारी- २, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, बांद्रा यांच्याकडे हस्तांतरीत करण्यात आले आहे.

अपिलार्थी यांनी सन- २०१२ मध्ये तहसिलदार (अति/निष्का) यांच्याकडून प्राप्त केलेली माहिती जन माहिती अधिकारी, सक्षम प्राधिकारी-२, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, बांद्रा यांच्याकडे सादर केलेल्या माहिती अर्जासोबत संलग्न केलेली नव्हती. म्हणून सुनावणी दरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांना उपलब्ध करुन देण्यात आली. प्रथम अपिलीय अधिकारी/ जन माहिती अधिकारी यांनी सदर माहितीच्या आधारे त्यांचे अभिलेख तपासून सदर माहिती त्यांच्या कार्यालयात उपलब्ध असणे आवश्यक आहे किंवा कसे याविषयी शासकीय धोरण/ आदेश अपिलार्थींना आदेशप्राप्तीच्या १५ दिवसांत नोंदणीकृत टपालाने कळवावे.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग पुढील आदेश देत आहे:

## आदेश

**१) जन माहिती अधिकारी यांनी वरील विवेचनानुसार कार्यवाही करावी.**

**२) अपील निकाली काढण्यात येत आहे.**

प्रदीप व्यास 11-8-2025

**मुंबई**
**दिनांक : ११.०८.२०२५**

State Information Commission, Greater Mumbai — सत्यमेव जयते

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**